## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये आदेश

जा.क्र.उपनि/भिवंडी/बी-२/का.क.८८/
स्वप्नपर्ती ग्रा.बि.शे.पत/१०८८/२०१७

-: कार्यालय :-

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी तालुका
दत्तात्रेय कृपा बिल्डींग ३ रा माळा,
स्टेट बॅंकेसमोर, जकात नाका,
सेंट्रल हॉस्पीटलच्या वर,भिवंडी, जि. ठाणे
दिनांक - ३१/१०/२०१७

वाचावे :-
१. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद
२. सौ. रेखा रा. तेलवणे व इतर ४६ खातेदार सभासद यांचा २८/०७/२०१७ रोजीचा तक्रार अर्ज.
३. श्री. व्ही. डी. गोस्वामी, शासकीय प्रमाणित लेखापरिक्षक यांचेकडील सन २०१६-१७ कालावधीचा या कार्यालयास प्राप्त दि. २५/१०/२०१७ रोजीचा विशेष अहवाल व लेखापरिक्षण अहवाल.

ज्याअर्थी,स्वप्नपुर्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,मु.पो. पडघा ता.भिवंडी जि. ठाणे ही नोंदणीकृत सहकारी संस्था असून ती या कार्यालयाच्या कार्यकक्षेत येते

ज्याअर्थी, स्वप्नपुर्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,तारामती अपार्टमेंट, मु.पो. पडघा ता.भिवंडी जि. ठाणे या संस्थेचे सन २०१६-२०१७ या वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक श्री. व्ही. डी. गोस्वामी, प्रमाणित लेखापरिक्षक, सहकारी संस्था यांनी केलेले असुन त्यांनी विशेष लेखापरिक्षण अहवाल या कार्यालयात दि. २५/१०/२०१७ रोजी सादर केला असुन सदर विशेष लेखापरिक्षण अहवालामध्ये गंभीर स्वरुपाचे दोष आढळुन आलेले आहेत.

ज्याअर्थी, संस्थेचे सभासद सौ. रेखा रा. तेलवणे व इतर ४६ खातेदार सभासद यांनी या कार्यालयाकडे संदर्भाधिन पत्रान्वये ठेविदारांना ठेवी परत मिळत नसल्याबाबतची तक्रार दाखल केलेली आहे. तक्रार अर्जाचे अवलोकन केले असता तक्रार अर्जातील मुद्दे हे गंभीर स्वरुपाचे असुन संस्थेच्या हितास हानीकारक आहे. सबब संस्थेच्या कामकाजाची चौकशी करणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाल्याने संस्थेच्या कामकाजाची सखोल चौकशी करुन तसा अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये उपरोक्त संस्थेच्या सोबत जोडलेल्या परिशिष्टातील मुद्यांवर चौकशी करण्यासाठी मी पुढील आदेश देत आहे.

-: आ दे श :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी आर एस लोखंडे, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, भिवंडी तालुका, स्वप्नपुर्ती ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या,मु.पो. पडघा ता.भिवंडी जि. ठाणे या संस्थेच्या कामकाजाच्या सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मधिल मुददयांवर चौकशी करण्यासाठी श्री. व्ही.डी.गोस्वामी, शासकीय प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था यांची प्राधिकृत चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करीत आहे. त्याबाबतचा अहवाल सहा महिन्यात या कार्यालयास सादर करावा. चौकशीची फी म्हणून रक्कम रु. २०,०००/- निश्चित करण्यांत येत आहे.

सदरचा आदेश आज दि. २५/१०/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

ठिकाण : भिवंडी

दि.३१/१०/२०१७

[आर एस लोखंडे]
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, भिवंडी तालुका,
ठाणे

..२...